# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने सचिवालय इमारत, तळमजला, एलफिस्टन कॉलेजच्या मागे, जहांगीर आर्ट गॅलरी समोर, काळा घोडा, फोर्ट मुंबई- ४०० ००१
०२२-२२८२१८१०/२२८२१७७० E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

जा.क्र.राआ/महा./PRO/ २०२०/ २२७५ दिनांकः- १५.१२.२०२०

## -: परिपत्रक :-

संदर्भः- १. शासन आदेश क्र. ग्रासंअ-२०२०/प्र.क्र.५७ / ग्रां सं-४ दि. ०९.१०.२०२०
२. मा. मुंबई उच्च न्यायालया समोर प्रलंबित असलेल्या जनहित याचिका क्र. OS PIL (L) ३७८३/२०२० मध्ये पारित करण्यात आलेले आदेश.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाच्या वरील संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये निम्नस्वाक्षरीकार यांची हंगामी अध्यक्ष राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग म्हणून नेमणूक केली आहे व सदर नियुक्ती आदेशामध्ये “हंगामी अध्यक्ष आणि इतर सदस्य विवादास्पद प्रकरणांवर सुनावणी करणार नाहित आणि निर्णय देणार नाहीत. ते एकतर्फी प्रकरणे निकालात काढू शकतील आणि सुनावणीकरीता पुढील तारखा देऊ शकतील. तथापि एकतर्फी प्रकरणांत, अशा हंगामी अध्यक्षांचे आणि सदस्यांचे मत सर्वसंमत असणे आवश्यक राहिल.” अशी अट नमुद करण्यात आलेली आहे व संदर्भ क्र. २ मध्ये नमुद केलेल्या जनहित याचिकेमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी प्रकरणांच्या प्रत्यक्ष सुनावणीबाबत दि. ०१.१२.२०२० रोजीचा आदेश पारित केलेला आहे;

त्याअर्थी सदर सुनावणीचे कारणामुळे कोवीड १९ चा प्रादुर्भाव होणार नाही याबाबत दक्षता घेणे आवश्यक असल्याने मी दिलीप रा. शिरासाव, हंगामी अध्यक्ष राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, राज्य आयोग मुंबई समोरील प्रकरणांच्या सुनावणीची खालील प्रमाणे व्यवस्था करीत आहे.

| अनु क्र. | दिवस | सत्र | प्रकरणांचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | सोमवार ते गुरुवार | सकाळचे सत्र | बेंच क्र. ३ च्या बोर्डवरील पहिली १० प्रकरणे |
| | | दुपारचे सत्र | बेंच क्र. १ वरील दरखास्त प्रकरणे व बेंच क्र. १ व २ समोरील तातडीचे आदेश मिळण्यासाठी विनंती अर्ज सादर केलेली प्रकरणे. |
| २ | शुक्रवार | - | व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी घेण्यात यावी असा विनंती अर्ज सादर करण्यात आलेली प्रकरणे. |

१. ज्या पक्षकारांना अथवा वकीलांना बेंच क्र. १ व २ समोरील प्रकरणांमध्ये तातडीचे/अंतरिम आदेशासाठी विनंती करावयाची आहे त्यांनी तसे अर्ज कार्यालयात किमान ४ दिवस आधी सादर करावेत तसेच विरुद्ध पक्षकारांना त्याबाबत तशी नोटीस द्यावी.
२. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी हवी असल्यास तसेच अर्ज किमान ४ दिवस आधी कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावेत व विरुद्ध पक्षकारांना तशी नोटीस द्यावी.
३. ज्या वकीलांना अथवा पक्षकारांना आपले प्रकरण कोर्टाच्या व्हेकेशन बेंच पुढे सुनावणीकरीता घ्यायचे आहे त्यांनी तसे विनंती अर्ज कार्यालयात सादर करावेत.

Sd/-
( दि. रा. शिरासाव )
हंगामी अध्यक्ष,
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र मुंबई.

प्रतः
१. न्यायिक सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग महाराष्ट्र मुंबई.
२. मा. सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग महाराष्ट्र मुंबई.
३. मा. अध्यक्ष, कंझ्युमर कोर्ट ॲडव्होकेटस असाशिअेशन मुंबई.